ICE 'n' SPICE
व्हेज रेस्टॉरन्ट
पंजाबी डिशेस् । पावभाजी । चाईनीज । ज्युसेस् । आईस्क्रीम
गोदावरी कॉम्प्लेक्स,व्ही.आय.पी.रोड,नांदेड
मो. 9422172572, 9850430189

सायं दैनिक
# नांदेड वार्ता
www.nandedwarta.com

• वर्ष २५ वे • अंक ८ • शनिवार दि.२६ सप्टेंबर २०२६ • नांदेड • पोस्ट परवाना/एनएनडी/आरएनपी-२६२/२०२६-२०२८ • पाने ४ • किंमत १ रु.

# राज्यातील २६५ तालुक्यांमध्ये दुष्काळ जाहीर

## महसुलात सूट,कर्जाचे पुनर्गठन,वसुलीस स्थगिती,वीज बिलात सवलत,परीक्षा फिस माफ आदी उपाययोजनांची घोषणा



मुंबई/प्रतिनिधी-राज्यातील पर्जन्यमानातील तूट आणि अन्य दुष्काळी निकषांचा विचार करून राज्य सरकारने ३५८ पैकी तब्बल २६५ तालुक्यांमध्ये दुष्काळ जाहीर केला आहे. यासंदर्भातील शासन निर्णय जारी करण्यात आला असून, दुष्काळग्रस्त तालुक्यांमध्ये पंचनामे करण्याची कार्यवाही तातडीने सुरू करण्याचे निर्देश जिल्हाधिकाऱ्यांना देण्यात आले आहेत. त्यामुळे पावसाअभावी संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांना शासनाच्या विविध सवलतींचा लाभ मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

कृषी आयुक्तांच्या अहवालानुसार जूनपासून आतापर्यंतच्या कालावधीत झालेली पर्जन्याची तूट तसेच अन्य घटकांमुळे राज्यातील २६५ तालुक्यांमध्ये दुष्काळी परिस्थिती निर्माण झाली आहे. या तालुक्यांमध्ये ट्रीगर-१ लागू झाल्याने पिकांची प्रत्यक्ष स्थिती तपासून पंचनामे करण्याची प्रक्रिया सुरू करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. सर्वेक्षण करण्यात आलेल्या क्षेत्रातील पिकांची स्थिती दर्शविणारी छायाचित्रे तसेच जीपीएस कोऑर्डिनेट संकलित करून पीक परिस्थितीचा अहवाल कृषी आयुक्तांमार्फत शासनाला सादर करण्याच्या सूचनाही देण्यात आल्या आहेत.

दुष्काळग्रस्त तालुक्यांमध्ये शासनाने विशेष बाब म्हणून विविध सवलती आणि उपाययोजना लागू करण्याचा निर्णय घेतला आहे. यामध्ये जमीन महसुलात सूट, पीक कर्जाचे पुनर्गठन, शेतीशी संबंधित कर्जाच्या वसुलीस स्थगिती आणि कृषी पंपांच्या चालू वीजबिलात सवलत यांचा समावेश आहे. ७.५ अश्वशक्तीपर्यंतच्या कृषी पंपांचे वीजबिल यापूर्वीच माफ करण्यात आले असून, त्यावरील क्षमतेच्या पंपांना शासन निर्णयानुसार सवलत लागू राहणार आहे.

दुष्काळाचा परिणाम विद्यार्थ्यांवर होऊ नये यासाठी शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या परीक्षा शुल्कात माफी देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. तसेच रोजगार हमी योजनेअंतर्गत कामांचे निकष शिथिल करून जास्तीत जास्त कामे सुरू करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. त्यामुळे शेतीतील रोजगार घटल्यास ग्रामीण भागातील मजुरांना रोजगार उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न केला जाणार आहे. पाणीटंचाई निर्माण झालेल्या भागात आवश्यकतेनुसार टँकरद्वारे पिण्याचे पाणी पुरविण्यात येणार आहे. टंचाई जाहीर झालेल्या गावांमध्ये शेतकऱ्यांच्या कृषी पंपांची वीजजोडणी खंडित न करण्याचेही निर्देश देण्यात आले आहेत. शेतीवर अवलंबून असलेल्या शेतकरी व मजुरांना अन्नधान्याची टंचाई भासू नये, यासाठी आवश्यक व्यवस्था करण्याच्या सूचना प्रशासनाला देण्यात आल्या आहेत. दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर जनावरांसाठी आवश्यक चारा उपलब्ध करून देणे, जलसंधारणाची कामे सुरू करणे तसेच पिण्याचे पाणी आणि पशुधनासाठी पाण्याचे नियोजन करण्याचे निर्देशही देण्यात आले आहेत. त्यामुळे दुष्काळग्रस्त भागात प्रशासनासमोर पाणी, चारा, रोजगार आणि शेती या चारही आघाड्यांवर उपाययोजना करण्याचे आव्हान असणार आहे.

दरम्यान, या २६५ तालुक्यांतील शेतकऱ्यांना पिकांच्या नुकसानीबाबतची आर्थिक मदत पंचनामे आणि विहित कार्यपद्धती पूर्ण केल्यानंतर स्वतंत्र शासन निर्णयाद्वारे जाहीर करण्यात येणार आहे. त्यामुळे प्रत्यक्ष नुकसानभरपाईची रक्कम किती आणि कोणत्या निकषांनुसार मिळणार, याकडे शेतकऱ्यांचे लक्ष लागले आहे. दुष्काळग्रस्त तालुक्यांमध्ये नांदेड जिल्ह्यातील नांदेड, बिलोली, कँधार, लोहा, हदगाव, भोकर, देगलूर, किनवट, हिमायतनगर, माहूर, धर्माबाद, उमरी, अर्धापूर, नायगाव, पूर्णा आणि पालम या तालुक्यांचा समावेश आहे. त्यामुळे नांदेड जिल्ह्यातील दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना शासनाच्या जाहीर केलेल्या सवलतींचा लाभ मिळण्याची अपेक्षा आहे.

राज्यातील दुष्काळग्रस्त तालुक्यांमध्ये महसूल सवलतीपासून पाणीपुरवठा, रोजगार, चारा आणि कर्जविषयक उपाययोजनांपर्यंत विविध निर्णय लागू करण्यात आले असले तरी पिकांच्या प्रत्यक्ष नुकसानीची भरपाई शेतकऱ्यांना कधी आणि किती मिळणार, हा महत्त्वाचा प्रश्न आहे. पंचनाम्याची प्रक्रिया जलदगतीने पूर्ण करून नुकसानभरपाई तातडीने वितरित करण्याची मागणी शेतकरी वर्गातून होत आहे.

# नांदेड जिल्ह्यातील चौदा तालुके दुष्काळग्रस्त जाहीर

## मुखेड,मुदखेडला वगळले

नांदेड/प्रतिनिधी-पावसातील तूट आणि दुष्काळी परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर राज्य शासनाने नांदेड जिल्ह्यातील १४ तालुक्यांचा दुष्काळग्रस्त तालुक्यांमध्ये समावेश केला आहे. नांदेड जिल्ह्यातील मुखेड व मुदखेड तालुक्यांना दुष्काळग्रस्तांच्या यादीतून वगळण्यात आल्याने याभागातील शेतकऱ्यांसह सर्वसामान्य नागरिकांमध्ये शासन व लोकप्रतिनिधीं विषयी तीव्र संताप व्यक्त केला जात आहे.

राज्य सरकारने राज्यातील २६५ तालुक्यात दुष्काळ आज (शनिवार) सकाळी जाहीर केला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या संदर्भात अधिकृत घोषणा केली. नांदेड जिल्ह्यातील नांदेड, अर्धापूर, भोकर, बिलोली, नायगाव, देगलूर, धर्माबाद, उमरी, हदगाव, हिमायतनगर, कँधार, लोहा, किनवट आणि माहूर या १४ तालुक्यांचा दुष्काळग्रस्त क्षेत्रात समावेश करण्यात आला आहे. पावसाअभावी खरीप पिकांवर मोठा परिणाम झाल्याने शेतकरी आर्थिक संकटात सापडला आहे. शासनाच्या निर्णयामुळे आता दुष्काळ निवारणाच्या उपाययोजनांना गती मिळण्याची अपेक्षा आहे.

मुदखेड व मुखेड या तालुक्यांना दुष्काळातून वगळण्यात आले आहे. खा.अशोक चव्हाण यांच्या अधिपत्याखाली व त्यांच्या कन्या ॲड.श्रीजया चव्हाण आमदार असलेल्या भोकर विधानसभा मतदारसंघातील मुदखेड तालुक्याला दुष्काळातून वगळण्यात आल्याने त्या भागातील जनतेमध्ये असंतोष पसरला आहे. मुदखेड तालुक्यात केळी, मोसंबी, संत्री, ऊस तसेच बागायती शेती व फुलांच्या बागा आहेत. सोयाबीन व कापसाचे पिक या तालुक्यात घेतले जाते. यावर्षी पाऊस अत्यंत कमी झाल्याने नदी, नाले कोरडेठाक आहेत. साठवण तलावामध्येही पाणीसाठा उपलब्ध नसल्याने कॅनॉललाही पाणी सोडले नाही. त्यामुळे शेतातील केळी व ऊस वाळून जात आहे. पावसाअभावी फुलाच्या शेतीवरही त्याचा मोठा परिणाम झाला. अशी दयनिय

पान ४ वर

# दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना शासन वाऱ्यावर सोडणार नाही

## उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांची ग्वाही



नांदेड/प्रतिनिधी-पावसाचा खंड पडल्यामुळे राज्यात दुष्काळसदृश्य परिस्थिती निर्माण झाली असून, शासनाने या परिस्थितीची गंभीर दखल घेतली आहे. प्रत्यक्ष पाहणी करून पंचनामे करण्याचे निर्देश प्रशासनाला दिले आहेत. पंचनामे व पाहणीनुसार नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना मदत देण्यात येईल. शेतकऱ्यांना शासन वाऱ्यावर सोडणार नाही, अशी ग्वाही उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांनी आज येथे दिली.

उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांनी आज नांदेड जिल्ह्यातील सोनखेड व लोहा येथे पीक परिस्थितीची पाहणी केली. यावेळी त्या बोलत होत्या. यावेळी सहकार मंत्री बाबासाहेब पाटील, आ.विक्रम काळे, आ.प्रताप पाटील चिखलीकर, आ.आनंद तिडके-बोंढारकर, जिल्हाधिकारी राहुल कर्डिले, मुख्य कार्यकारी अधिकारी महेश पाटील यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

पावसाअभावी शेतीतील पिके करपून गेली असून, शेतकऱ्यांची परिस्थिती अत्यंत गंभीर आहे. मी मराठवाड्याचीच लेक असून, मराठवाड्यातील दुष्काळाची परिस्थिती चांगल्या प्रकारे जाणते. शेतकऱ्यांच्या भावनांची शासनाने गंभीर दखल घेतली आहे. प्रशासनाला प्रत्यक्ष पाहणी करून पंचनामे करण्याचे निर्देश दिले आहेत. ज्या शेतकऱ्यांचे ज्या प्रकारे नुकसान झाले आहे, त्यांना त्यानुसार मदत देण्यात येईल. सर्व पात्र शेतकऱ्यांना कर्जमाफीचा लाभ देण्यात येणार असल्याचेही उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांनी सांगितले.दुष्काळी परिस्थितीत शेतकरी कुटुंबांना पिण्याचे पाणी, जनावरांसाठी पिण्याचे पाणी, चारा तसेच मुलांच्या शिक्षणासाठी शासन आवश्यक मदत करणार आहे. शासन शेतकऱ्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे असून, लवकरच नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना मदत देण्यात येईल, असे उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांनी यावेळी स्पष्ट केले.यावेळी

पान ४ वर

# ढोल-ताशांच्या गजरात लाडक्या श्री गणरायाला निरोप




नांदेड/प्रतिनिधी-गुलालाची उधळण, ढोल-ताशांचा गजर, गणपती बाप्पा मोरया, पुढच्या वर्षी लवकर या या घोषणांच्या गजरात अनंतचतुदर्शीच्या दिवशी (शुक्रवार) भक्तांनी लाडक्या गणरायाला विसर्जनस्थळी निरोप दिला. नांदेड शहरात श्री गणेश विसर्जन मिरवणूक शांततेत व उत्साहात संपन्न झाली.

बारा दिवसाच्या मुक्कामानंतर अनंत चतुदर्शीच्या दिवशी श्री गणेश विसर्जन मिरवणुकीला शुक्रवारी सकाळी उत्साहात प्रारंभ झाला. ढोल-ताशांचा गजजर व गुलालाची उधळण करीत गणेश मंडळाच्या मिरवणुकांना सुरुवात झाली. विशेष म्हणजे एकाही गणेश मंडळाने श्री विसर्जन मिरवणुकीसमोर डीजे लावलेला नव्हता. प्रशासनाने केलेल्या आवाहनाला गणेश मंडळांच्या पदाधिकाऱ्यांनी उत्स्फुर्त प्रतिसाद दिला आहे. बँड पथक, ढोल-ताशे, टाळ-मृदंगाचा गजर व गणपती बाप्पा मोरयांच्या घोषणा देत मिरवणुका विसर्जनस्थळी मार्गस्थ झाल्या. जुन्या नांदेड शहरातही श्री गणेश विसर्जन शांततेत व आनंदी वातावरणात संपन्न झाले. सांगवी, पासदगाव, नगिनाघाट, नावघाट या विसर्जनस्थळी तसेच किवळा साठवण तलाव व येळगाव येथील खदानीत श्री गणेश मूर्तींचे विसर्जन करण्यात आले. प्रशासनाने निर्माण केलेल्या गणेश मूर्ती संकलन केंद्रात अनेक गणेश मूर्तींचे संकलन करण्यात आले. महापालिकेकडून सांगवी येथे कृत्रीम तलाव तयार करण्यात आला होता. या तलावात लहान व मध्यम मूर्तींचे विसर्जन केले आहे. शहरातील अनेक ठिकाणी गणेश भक्तांसाठी राजकीय पक्षाचे पदाधिकारी व सेवाभावी संस्थांकडून प्रसाद वाटप करण्यात आले. पोलीस अधीक्षक डॉ.नीलाभ रोहन यांच्या नेतृत्वाखाली मोठ्या प्रमाणात पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. श्री गणेश विसर्जन मिरवणूक शांततेत संपन्न होण्यासाठी पोलीस उपअधीक्षक प्रशांत शिंदे, पोलीस उपअधीक्षक श्री वैंजने यांच्यासह सहाही पोलीस स्टेशनचे प्रभारी पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

# सरकारने दिलेला शब्द पाळला-खा.अशोक चव्हाण

नांदेड/प्रतिनिधी-सन २०२६ च्या खरीप हंगामात ट्रिगर-१ लागू झालेल्या राज्याच्या ३४ जिल्ह्यातील ३५५ तालुक्यांपैकी एकूण २६५ तालुक्यांमध्ये राज्य सरकारने दुष्काळ जाहीर केला आहे. शेतकऱ्यांच्या संकट काळात मदतीला धावून जाण्याचा शब्द राज्य सरकारने पाळला आहे, अशी प्रतिक्रिया माजी मुख्यमंत्री खा.अशोक चव्हाण यांनी व्यक्त केली.

नांदेड जिल्ह्यामध्ये १६ पैकी १४ तालुक्यांमध्ये ट्रिगर-१ म्हणजेच पावसाची तूट आणि खंडाचा निकष लागू झाला आहे. मात्र मुदखेड आणि मुखेड या दोन तालुक्यात ट्रिगर-१ लागू झाला नाही. त्यामुळे दुष्काळी तालुक्यांच्या पहिल्या यादीत त्यांचा समावेश नाही. मुदखेड व मुखेड या दोन्ही तालुक्यात जिल्ह्यातील इतर तालुक्यांप्रमाणेच दुष्काळी परिस्थिती आहे. त्यामुळे इतर निकषांच्या आधारे मुदखेड व मुखेड हे दोन तालुके दुष्काळग्रस्त तालुक्यांच्या पुढील यादीत समाविष्ट करावेत, अशी आमची मागणी आहे. या संदर्भात माझे प्रशासनाशी बोलणे झाले असून, या दोन तालुक्यातील शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी आम्ही आग्रहपूर्वक पाठपुरावा करू, असे खा.अशोक चव्हाण यांनी म्हटले आहे.

## ज्ञानेश कुमार काही बोलत का नाहीत?

**निवडणूक हा लोकशाहीचा उत्सव आहे. त्या उत्सवाचा पंच निष्पक्ष, पारदर्शक आणि विश्वासार्ह असणे ही केवळ घटनात्मक गरज नाही, तर लोकशाहीच्या अस्तित्वाची पूर्वअट आहे. मग गेल्या काही वर्षांपासून निवडणूक आयोगाभोवती निर्माण होत असलेल्या प्रश्नांवर मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार काही बोलत का नाहीत? लोकसभा निवडणुकीनंतर महाराष्ट्रासह विविध राज्यांतील विधानसभा निवडणुकांच्या काळात मतदारसंख्या, मतदानाची टक्केवारी, मतदार यादीतील फेरफार आणि मतदारांची नावे वगळण्यावरून गंभीर प्रश्न उपस्थित झाले. महाराष्ट्रात लोकसभा आणि विधानसभा निवडणुकांदरम्यान मतदारसंख्येत झालेल्या वाढीवर काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी प्रश्न उपस्थित केले आणि आकडेवारीचे सादरीकरण केले. निवडणूक आयोगाने मात्र या आरोपांना उत्तर देताना ४०.८१ लाख मतदारांची निव्वळ वाढ झाल्याचे सांगितले आणि त्यातील २६.४६ लाख मतदार १८ ते २९ वयोगटातील असल्याचे स्पष्ट केले. त्यामुळे या मुद्द्यावर आरोप-प्रत्यारोपांची मालिका सुरु राहिली.पण आता प्रश्न केवळ विरोधकांच्या आरोपांचा राहिलेला नाही. निवडणूक आयोगाच्या आतूनच प्रश्न उपस्थित झाले आहेत. इंडियन एक्स्प्रेसच्या २३ सप्टेंबरच्या तपासणी अहवालानुसार, निवडणूक आयुक्त सुखबीरसिंग संधू आणि विवेक जोशी यांनी गेल्या दहा महिन्यांत किमान १४ वेळा आयोगाच्या काही निर्णयांवर औपचारिक आक्षेप नोंदवले. नवीन मतदार नोंदणी, मतदारांची नावे वगळणे, मतदार यादीच्या डेटाबेसचे केंद्रीकरण आणि फॉर्म क्रमांक ६ मध्ये करण्यात आलेल्या बदलांबाबत त्यांनी प्रश्न उपस्थित केले. यातील फॉर्म क्रमांक ६ चा मुद्दा तर विशेष गंभीर आहे. नवीन मतदार नोंदणीसाठी वापरल्या जाणाऱ्या या वैधानिक अर्जात एसआयआरशी संबंधित घोषणा समाविष्ट करण्याच्या निर्णयावर दोन्ही निवडणूक आयुक्तांनी आक्षेप घेतल्याचे अहवालात नमूद आहे. त्यांच्या मते, अशा प्रकारचा बदल करण्यासाठी संबंधित नियमांमध्ये दुरुस्ती आवश्यक होती. तरीही हा बदल करण्यात आला, असा इंडियन एक्स्प्रेसचा दावा आहे. दोन निवडणूक आयुक्तांनी स्वतःच्या संस्थेतील निर्णयप्रक्रियेवर अशा प्रकारे आक्षेप नोंदवणे ही साधी प्रशासकीय बाब म्हणून दुर्लक्ष करण्यासारखी नाही. कारण प्रश्न एखाद्या पक्षाचा नाही; प्रश्न आहे मतदाराच्या नावाचा आणि त्याच्या मतदानाच्या घटनात्मक अधिकाराचा.निवडणूक आयोगाने प्रसिद्धीस दिलेल्या स्पष्टीकरणात आयोगाच्या निर्णयांवर मतभेद असू शकतात, असे म्हटले आहे. मात्र निवडणूक आयोगाची रचना करताना मुख्य निवडणूक आयुक्त आणि अतिरिक्त निवडणूक आयुक्त यांना समान अधिकार देण्यात आले आहेत. एखादा निर्णय सर्वसंमतीने होत नसेल, तर तो बहुमताने घ्यावा, अशी अत्यंत स्पष्ट तरतूद आयोगाच्या कार्यपद्धतीत आहे. मग दोन्ही आयुक्तांची मते आणि आक्षेप लक्षात न घेता मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांनी स्वतःचा मनमानी कारभार का केला?, असा प्रश्न उपस्थित होतो. मतभेद असणे ही संस्थात्मक प्रक्रियेचा भाग असू शकतो; परंतु त्या मतभेदांवर बहुमताने निर्णय झाला का, त्याची कारणे काय होती आणि संबंधित नोंदी जनतेसमोर का ठेवल्या जात नाहीत, याचे उत्तर आयोगाने द्यायला हवे.पश्चिम बंगालमधील एसआयआरने या प्रश्नाला आणखी गंभीर रूप दिले. निवडणूक आयोगाच्या म्हणण्यानुसार २७.१६ लाख मतदारांची नावे वगळण्यात आली आणि त्यापैकी २२ लाखांहून अधिक मतदारांनी पुनर्स्थापनेसाठी अपील केले. सर्वोच्च न्यायालयाच्या हस्तक्षेपानंतर या प्रक्रियेत न्यायिक अधिकाऱ्यांची भूमिका आली. आयोगाने न्यायालयाला दिलेल्या माहितीनुसार लाखो अपिले प्रलंबित आहेत.म्हणजेच, मतदार यादीतील एका नावामागे केवळ एक आकडा नसतो; त्या नावामागे एक नागरिक, त्याचा मतदानाचा अधिकार आणि लोकशाहीतील त्याचा सहभाग असतो. चुकीने नाव वगळले गेले तर त्या नागरिकाला नंतर अपील करण्याची संधी मिळू शकते; पण निवडणुकीचा दिवस निघून गेल्यानंतर मिळालेला न्याय त्याचे मतदान परत आणू शकत नाही.हा सगळा घोळ बाहेर आल्यानंतर शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी महाराष्ट्रात झालेल्या विधानसभा निवडणुका रद्द करून पुन्हा निवडणुका घेण्याची मागणी केली आहे. आता ही मागणी केवळ महाराष्ट्रापुरती मर्यादित राहिलेली नाही. दिल्ली आणि पश्चिम बंगालमधूनही अशाच मागण्या पुढे येत आहेत. काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी हरियाणा राज्यात झालेल्या निवडणुका रद्द करण्याची मागणी केली आहे. या मागण्या राजकीयदृष्ट्या वादग्रस्त असू शकतात; परंतु निवडणूक प्रक्रियेवरील संशय वाढत असताना त्या सर्वसामान्य नागरिकांना पूर्णपणे चुकीच्या वाटत नाहीत, ही वस्तुस्थिती आहे. त्यामुळे या मागण्यांकडे केवळ राजकीय आरोप म्हणून दुर्लक्ष न करता, निवडणूक आयोगाने त्यामागील शंका, आकडेवारी आणि प्रक्रियात्मक प्रश्नांवर स्पष्ट स्पष्टीकरण देणे आवश्यक आहे.मग मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांनी या सर्व प्रश्नांवर स्वतः स्पष्टपणे बोलण्याची वेळ आली नाही का? आयोगाने इंडियन एक्स्प्रेसच्या अहवालाला उत्तर देताना सर्व निर्णय पूर्ण आयोगाच्या एकमताने झाल्याचे म्हटले आहे. आयोगाच्या म्हणण्यानुसार अंतर्गत चर्चेत मतभेद आणि निरीक्षणे होणे ही संस्थात्मक प्रक्रियेचा भाग आहे. हे स्पष्टीकरण महत्त्वाचे आहे; पण त्यातून प्रश्न संपत नाही. उलट प्रश्न अधिक स्पष्ट होतात. जर निर्णय खरोखर सर्वानुमते झाले असतील, तर १४ वेळा नोंदवलेले आक्षेप नेमके कशाबाबत होते? फॉर्म क्रमांक ६ मध्ये बदल का करण्यात आला? मतदार यादीचे केंद्रीकरण का झाले? मतभेद असताना बहुमताने निर्णय घेण्यात आला का? आणि ज्या मतदारांची नावे वगळली गेली त्यातील किती नावे चुकीने वगळली गेली? या प्रश्नांची उत्तरे राजकीय पक्षांनी देण्याची गरज नाही. उत्तरे निवडणूक आयोगानेच द्यायची आहेत. निवडणूक आयोग हा कोणत्याही सत्ताधारी पक्षाचा किंवा विरोधी पक्षाचा आयोग नाही. तो भारताच्या संविधानाचा आयोग आहे. त्यामुळे आयोगावर आरोप झाले की, तातडीने बचावात्मक प्रतिक्रिया देण्यापेक्षा कागदपत्रे, आकडे आणि निर्णयप्रक्रिया जनतेसमोर ठेवणे अधिक आवश्यक आहे. आज सर्वसामान्य नागरिक विचारत आहे. ''ज्ञानेश कुमार काही बोलत का नाहीत?'' हा प्रश्न कोणत्याही पक्षाचे घोषवाक्य नाही. हा प्रश्न लोकशाहीवरील विश्वासाचा आहे. निवडणूक आयोगाने शांत राहून हा प्रश्न अधिक मोठा होऊ देऊ नये. कारण लोकशाहीत मतदाराचा विश्वास एकदा ढासळला, तर तो पुन्हा निर्माण करण्यासाठी केवळ निवडणूक घेणे पुरेसे नसते; सत्य, पारदर्शकता आणि उत्तरदायित्व दाखवावे लागते. ज्ञानेश कुमार यांनी बोलावे. राजकीय भाषेत नव्हे, घटनात्मक जबाबदारीच्या भाषेत.**

# जागतिक वारशातून महाराष्ट्राच्या पर्यटनाची वैश्विक ओळख

दरवर्षी २७ सप्टेंबर रोजी जगभरात जागतिक पर्यटन दिन साजरा केला जातो. पर्यटन म्हणजे केवळ एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी जाणे, निसर्गरम्य स्थळांना भेट देणे किंवा विरंगुळा साधणे एवढ्यापुरते त्याचे स्वरूप मर्यादित राहिलेले नाही. आज पर्यटन हे सांस्कृतिक देवाणघेवाण, रोजगारनिर्मिती, स्थानिक अर्थव्यवस्था, पर्यावरणसंवर्धन आणि विविध समाजांना परस्परांशी जोडणारे महत्त्वाचे माध्यम बनले आहे. संयुक्त राष्ट्रांच्या मते पर्यटन हे शाश्वत विकासाच्या उद्दिष्टांशी जोडलेले महत्त्वाचे क्षेत्र असून सांस्कृतिक व नैसर्गिक संपत्तीचा अनुभव घेण्याबरोबरच अनेक समाजांच्या उपजीविकेलाही त्यातून आधार मिळतो. २०२६ च्या जागतिक पर्यटन दिनाची अधिकृत संकल्पना पर्यटनाच्या पुनर्रचनेसाठी डिजिटल कार्यसूची आणि कृत्रिम बुद्धिमत्ता अशी आहे. त्यामुळे यंदाच्या पर्यटन दिनाच्या निमित्ताने पर्यटनाच्या वाढीबरोबरच वारसा संवर्धन, स्थानिक सहभाग आणि आधुनिक तंत्रज्ञानाचा सुयोग्य वापर यांचा विचार करणे आवश्यक ठरते.

महाराष्ट्राच्या पर्यटनवैभवाचा विचार केला तर इतिहास, संस्कृती, स्थापत्य, निसर्ग आणि लोकजीवन यांचा अद्भुत संगम येथे पाहायला मिळतो. सह्याद्रीच्या पर्वतरांगा, कोकणचा समुद्रकिनारा, प्राचीन शैललेणी, ऐतिहासिक किल्ले, मुंबईतील वैशिष्ट्यपूर्ण वास्तू, विविध धार्मिक आणि सांस्कृतिक परंपरा तसेच जैवविविधतेने समृद्ध पश्चिम घाट यांमुळे महाराष्ट्राला पर्यटनाच्या क्षेत्रात वैशिष्ट्यपूर्ण स्थान प्राप्त झाले आहे. या समृद्ध वारशातील अनेक स्थळांना युनेस्कोने जागतिक वारसा म्हणून मान्यता दिली आहे. अजिंठा, वेरूळ आणि घारापुरीच्या प्राचीन लेण्यांपासून छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस, मुंबईतील व्हिक्टोरियन गॉथिक आणि आर्ट डेको वास्तुसमूह, पश्चिम घाट आणि २०२५ मध्ये जागतिक वारसा यादीत समाविष्ट झालेल्या मराठा मिलिटरी लँडस्केप्स ऑफ इंडियापर्यंत महाराष्ट्राच्या जागतिक वारशाची व्याप्ती अत्यंत मोठी आहे. हा वारसा महाराष्ट्राच्या इतिहासाची आणि सांस्कृतिक समृद्धीची साक्ष देतानाच पर्यटनाला आंतरराष्ट्रीय ओळख मिळवून देणारा महत्त्वाचा आधार ठरतो. जागतिक वारसा म्हणून एखाद्या स्थळाला मिळणारी मान्यता ही केवळ पर्यटनाच्या दृष्टीने मिळालेली प्रतिष्ठा नसते. मानवी संस्कृती किंवा निसर्गाच्या दृष्टीने असाधारण सार्वत्रिक मूल्य असलेल्या स्थळाचे महत्त्व संपूर्ण मानवजातीच्या संदर्भात अधोरेखित करणारी ही मान्यता असते. त्यामुळे जागतिक वारसा स्थळे ही एखाद्या प्रदेशाची मालमत्ता न राहता व्यापक मानवतेचा सामूहिक ठेवा बनतात. महाराष्ट्रातील जागतिक वारसा स्थळांकडे पाहिले असता प्राचीन बौद्ध कला, हिंदू आणि जैन स्थापत्य, शैलशिल्पकला, औद्योगिक युगातील वास्तुरचना, आधुनिक नागरी नियोजन, जैवविविधता आणि मराठा दुर्गव्यवस्था अशा विविध पैलूंचा परिचय होतो. म्हणूनच महाराष्ट्रातील वारसा पर्यटन हे इतिहास आणि वर्तमान यांना जोडणारे प्रभावी माध्यम ठरू शकते.

महाराष्ट्राच्या प्राचीन सांस्कृतिक वैभवाचा विचार करताना अजिंठा लेण्यांना विशेष महत्त्व द्यावे लागते. वाघोरा नदीच्या परिसरातील डोंगरकड्यांमध्ये कोरलेल्या या लेणीसमूहात बौद्ध परंपरेशी संबंधित चैत्यगृहे, विहारे, शिल्पे आणि भित्तिचित्रे आढळतात. अजिंठ्याच्या भित्तिचित्रांमध्ये मानवी भावना, सामाजिक जीवन, पोशाख, अलंकार, राजदरबारी वातावरण आणि धार्मिक कथानकांचे कलात्मक चित्रण दिसते. त्यामुळे अजिंठा हा केवळ धार्मिक वारसा नसून प्राचीन भारतीय समाजजीवन आणि कलासंस्कृतीचा महत्त्वपूर्ण दृश्य दस्तऐवज आहे. युनेस्कोने १९८३ मध्ये अजिंठ्याचा जागतिक वारसा यादीत समावेश केला. आज देश-विदेशातील पर्यटक, संशोधक, विद्यार्थी आणि कलावंतांसाठी अजिंठा आकर्षणाचे केंद्र आहे. मात्र भित्तिचित्रे आणि शैलरचना अत्यंत नाजूक असल्यामुळे वाढती पर्यटकसंख्या, आर्द्रता, प्रकाश, मानवी हस्तक्षेप आणि पर्यावरणीय परिणाम यांचे योग्य व्यवस्थापन करणे आवश्यक आहे. पर्यटनातून अजिंठ्याची ओळख वाढावी; परंतु पर्यटनाच्या दबावामुळे त्याच्या कलासंपदेचे नुकसान होऊ नये, हा समतोल जपणे गरजेचे आहे.

अजिंठ्यानंतर वेरूळ लेणी महाराष्ट्राच्या जागतिक वारशातील



आणखी एक अनमोल ठेवा आहे. दोन किलोमीटरपेक्षा अधिक परिसरात पसरलेल्या ३४ लेण्यांमध्ये बौद्ध, हिंदू आणि जैन परंपरांशी संबंधित स्थापत्य आणि शिल्पकलेचा संगम दिसतो. इ.स. सहाव्या ते बाराव्या शतकादरम्यान विकसित झालेला हा लेणीसमूह प्राचीन भारतातील कलात्मक आणि तांत्रिक प्रगतीचे दर्शन घडवतो. विविध धार्मिक परंपरांच्या वास्तू एकाच परिसरात विकसित झाल्यामुळे वेरूळला सांस्कृतिक सहअस्तित्वाच्या दृष्टीनेही विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. येथील कैलास मंदिर हे एकाच खडकातून साकारलेले भव्य स्थापत्य उदाहरण आहे. खडक कापण्याचे तंत्र, वास्तूचे नियोजन, सूक्ष्म शिल्पकला आणि अभियांत्रिकी कौशल्य यांचा अप्रतिम संगम येथे पाहायला मिळतो. युनेस्कोने १९८३ मध्ये वेरूळचा जागतिक वारसा म्हणून समावेश केला. त्यामुळे वेरूळ हे महाराष्ट्राच्या सांस्कृतिक पर्यटनाचे तसेच प्राचीन भारतीय स्थापत्यपरंपरेचे जागतिक प्रतिनिधित्व करणारे महत्त्वाचे स्थळ आहे.

**सुजाता मोरे**

मुंबईजवळील घारापुरी किंवा एलिफंटा लेणी महाराष्ट्राच्या जागतिक वारशातील आणखी एक महत्त्वाचे सांस्कृतिक स्थळ आहे. अरबी समुद्रातील घारापुरी बेटावर असलेल्या या लेण्यांमध्ये शिवपरंपरेशी संबंधित भव्य शैलशिल्पांचा आविष्कार दिसतो. मुख्य गुहेतील सुमारे सात मीटर उंचीचे सदाशिव शिल्प या स्थळाचे प्रमुख आकर्षण आहे. या शिल्पात शिवाच्या तीन पैलूंचे प्रतीकात्मक दर्शन घडते. घारापुरी बेटावर इ.स.पूर्व दुसऱ्या शतकापासून मानवी वस्तीचे पुरावे असल्याचे युनेस्कोच्या नोंदीत नमूद आहे, तर शैलगृहांची निर्मिती साधारणपणे इ.स. पाचव्या-सहाव्या शतकात झाली. युनेस्कोने १९८७ मध्ये घारापुरी लेण्यांना जागतिक वारसा म्हणून मान्यता दिली. मुंबईपासून समुद्रमार्गे पोहोचता येत असल्यामुळे या स्थळाला सांस्कृतिक तसेच पर्यटनाच्या दृष्टीने विशेष महत्त्व आहे. समुद्री वातावरण, बेटावरील पर्यावरण, पर्यटकांची गर्दी आणि पुरातत्त्वीय अवशेषांचे संरक्षण यांचा समतोल राखणे मात्र अत्यावश्यक आहे. महाराष्ट्राच्या जागतिक वारशात आधुनिक नागरी इतिहासाचे प्रतिनिधित्व करणारे छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस हे एक महत्त्वाचे स्थळ आहे. पूर्वीच्या व्हिक्टोरिया टर्मिनसची ही वास्तू व्हिक्टोरियन गॉथिक पुनरुज्जीवन स्थापत्यशैली आणि भारतीय पारंपरिक स्थापत्यघटक यांच्या संगमाचे उल्लेखनीय उदाहरण आहे. १८७८ मध्ये बांधकामास सुरुवात झालेल्या या वास्तूची निर्मिती सुमारे दहा वर्षांत पूर्ण झाली. घुमट, मनोरे, टोकदार कमानी, दगडी कोरीवकाम आणि विविध अलंकारिक घटक तिच्या स्थापत्यवैशिष्ट्याला अधोरेखित करतात. ब्रिटिश वास्तुविशारद आणि भारतीय कारागीर यांच्या सहकार्याने तयार झालेल्या या वास्तूत दोन स्थापत्यपरंपरांचा संवाद दिसतो. युनेस्कोने २००४ मध्ये छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनसचा जागतिक वारसा म्हणून समावेश केला. विशेष म्हणजे ही वास्तू आजही कार्यरत रेल्वे स्थानक आहे. त्यामुळे वारसा संवर्धन आणि आधुनिक सार्वजनिक वापर यांचा समतोल राखण्याचे हे महत्त्वाचे उदाहरण ठरते.

मुंबईतील व्हिक्टोरियन गॉथिक आणि आर्ट डेको वास्तुसमूह हा आधुनिक नागरी वारशाचा वेगळा आणि आकर्षक पैलू समोर आणतो. ओव्हल मैदानाच्या परिसरातील व्हिक्टोरियन गॉथिक शैलीतील सार्वजनिक वास्तू आणि त्याच्या पश्चिमेकडील आर्ट डेको इमारती मुंबईच्या नागरी विकासाच्या दोन महत्त्वपूर्ण टप्प्यांचे प्रतिनिधित्व करतात. व्हिक्टोरियन वास्तूंमध्ये युरोपीय शैलीसोबत भारतीय घटकांचा वापर आणि स्थानिक हवामानाशी जुळवून घेण्यासाठी केलेली रचना दिसते. आर्ट डेको इमारतींमध्येही भारतीय रचनात्मक प्रभाव आणि आधुनिक स्थापत्यभाषेचा संगम आढळतो. युनेस्कोने २०१८ मध्ये या वास्तुसमूहाला जागतिक वारसा म्हणून मान्यता दिली. या वास्तू मुंबईच्या आधुनिकतेच्या प्रवासाची साक्ष देतात. त्यामुळे मुंबईचे पर्यटन समुद्रकिनारे, बाजारपेठा आणि मनोरंजन यांपुरते मर्यादित न ठेवता वास्तुशास्त्र, नागरी नियोजन आणि आधुनिक इतिहासाच्या अभ्यासाशी जोडता येऊ शकते.

महाराष्ट्राच्या जागतिक वारशात नैसर्गिक संपत्तीचे स्थानही तितकेच महत्त्वाचे आहे. पश्चिम घाट हा महाराष्ट्रासह अनेक राज्यांत पसरलेला प्राचीन पर्वतीय प्रदेश आहे. युनेस्कोच्या मते पश्चिम घाट हिमालयापेक्षा जुना असून त्याचे भूआकृतिक आणि पर्यावरणीय महत्त्व मोठे आहे. येथील पर्वतीय वनव्यवस्था भारतीय मान्सूनच्या हवामानावर प्रभाव टाकते. जैवविविधता आणि स्थानिक प्रजातींच्या दृष्टीने पश्चिम घाट जगातील महत्त्वपूर्ण जैवविविधता क्षेत्रांपैकी एक आहे. युनेस्कोने पश्चिम घाटाच्या नैसर्गिक वारशाला जागतिक महत्त्व दिले आहे. त्यामुळे महाराष्ट्रातील पश्चिम घाट परिसरात निसर्गभ्रमंती, पक्षीनिरीक्षण, जैवविविधता अभ्यास, गिरिभ्रमण आणि पर्यावरणशिक्षण यांसारख्या पर्यटनप्रकारांना मोठी संधी आहे. परंतु निसर्गपर्यटनाच्या नावाखाली अनियंत्रित बांधकाम, जंगलांवरील दबाव, प्लास्टिक कचरा, जलप्रदूषण आणि पर्यटकांची अनियंत्रित गर्दी वाढणे टाळणे आवश्यक आहे. निसर्ग हा पर्यटनाचा उपभोग घेण्याचा विषय नसून संवर्धनासह अनुभवण्याची सामूहिक संपत्ती आहे.

महाराष्ट्राच्या जागतिक पर्यटनाच्या नकाशावर अलीकडील काळात झालेली महत्त्वाची भर म्हणजे मराठा मिलिटरी लँडस्केप्स ऑफ इंडिया. २०२५ मध्ये या मालिकेचा युनेस्कोच्या जागतिक वारसा यादीत समावेश झाला. या मालिकेत बारा प्रमुख किल्ल्यांचा समावेश आहे. त्यापैकी महाराष्ट्रातील साल्हेर, शिवनेरी, लोहगड, रायगड, खांदेरी, प्रतापगड, राजगड, पन्हाळा, सुवर्णदुर्ग, विजयदुर्ग आणि सिंधुदुर्ग हे अकरा किल्ले आहेत, तर जिंजी किल्ला तमिळनाडूमध्ये आहे. हे किल्ले सतराव्या शतकाच्या उत्तरार्धापासून एकोणिसाव्या शतकाच्या प्रारंभापर्यंत बांधले, विकसित किंवा विस्तारले गेले. डोंगराळ आणि सागरी भूभागाचा संरक्षणव्यवस्थेसाठी केलेला कल्पक वापर हे या दुर्गव्यवस्थेचे महत्त्वाचे वैशिष्ट्य आहे. युनेस्कोने या किल्ल्यांच्या जाळ्याला मराठा लष्करी रणनीती आणि भूगोलाशी एकरूप झालेल्या संरक्षणव्यवस्थेचे प्रतिनिधित्व मानले आहे.

या नव्या जागतिक वारसा मान्यतेमुळे महाराष्ट्राच्या दुर्गपर्यटनाला आंतरराष्ट्रीय संदर्भ प्राप्त झाला आहे. विशेषतः नाशिक जिल्ह्यातील साल्हेर किल्ल्याचा या वारसा मालिकेत समावेश झाल्यामुळे नाशिकच्या पर्यटनात ऐतिहासिक दुर्गसंस्कृतीचा महत्त्वपूर्ण आयाम अधिक ठळक झाला आहे. कोकणातील सिंधुदुर्ग, विजयदुर्ग आणि सुवर्णदुर्ग यांसारखे सागरी किल्ले समुद्री संरक्षणव्यवस्थेची आणि किनारी भूगोलाशी जुळलेल्या इतिहासाची ओळख करून देतात. दुसरीकडे रायगड, राजगड, प्रतापगड, शिवनेरी, लोहगड, पन्हाळा आणि साल्हेरसारखे किल्ले सह्याद्रीच्या भूगोलाशी जोडलेल्या दुर्गव्यवस्थेचे दर्शन घडवतात. त्यामुळे महाराष्ट्रात वारसा किल्ल्यांचे पर्यटन विकसित करताना केवळ किल्ल्यांची वास्तू न दाखवता त्यांचा भूगोल, स्थानिक समाज, लोकपरंपरा, जैवविविधता आणि ऐतिहासिक संदर्भ पर्यटकांसमोर मांडणे आवश्यक आहे. जागतिक वारसा स्थळांचे पर्यटन स्थानिक समाजाच्या विकासाशी जोडले गेले तर त्याचे महत्त्व अधिक वाढते. वारसा स्थळांच्या परिसरातील युवकांना प्रशिक्षित पर्यटनमार्गदर्शक, वारसा-दुभाषे आणि डिजिटल माहितीसेवा पुरवठादार म्हणून संधी देता येऊ शकते. स्थानिक महिलांना पारंपरिक खाद्यसंस्कृती, हस्तकला आणि लघुउद्योगांशी जोडता येते. स्थानिक कलाकार, वाहनचालक, निवासव्यवस्था पुरविणारे उद्योजक आणि इतर लघुव्यावसायिक यांनाही पर्यटनातून रोजगार मिळू शकतो. अशा प्रकारे पर्यटनाचा आर्थिक लाभ स्थानिक समाजापर्यंत पोहोचविणे हे शाश्वत वारसा पर्यटनाचे महत्त्वाचे उद्दिष्ट असले पाहिजे. वारसा ज्या समाजाच्या परिसरात आहे, त्या समाजाचा पर्यटन नियोजनात आणि संवर्धनात सक्रिय सहभाग असणे आवश्यक आहे.

वारसा पर्यटनासमोर आव्हानेही कमी नाहीत. पर्यटकांची अनियंत्रित गर्दी, प्लास्टिक आणि इतर कचरा, भिंतींवर नावे लिहिणे, शिल्पांना स्पर्श करणे, अनधिकृत बांधकाम, ध्वनीप्रदूषण आणि वाहतुकीचा वाढता दबाव यांमुळे वारसा स्थळांचे नुकसान होऊ शकते. त्यामुळे अधिक पर्यटक म्हणजे अधिक पर्यटनविकास ही संकल्पना बदलून जबाबदार पर्यटक, सुरक्षित वारसा आणि स्थानिकांना लाभ या तत्त्वांना प्राधान्य द्यावे लागेल. प्रत्येक स्थळाची वहनक्षमता लक्षात घेऊन पर्यटक व्यवस्थापन करणे, कचरा व सांडपाणी व्यवस्थापन सुधारणे, स्वच्छतागृहे आणि पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करणे, प्रशिक्षित मार्गदर्शक उपलब्ध करून देणे आणि संवेदनशील भागांमध्ये प्रवेशाचे नियमन करणे आवश्यक आहे. पर्यटनाच्या नावाखाली वारशाच्या मूळ स्वरूपात होणारे अनावश्यक बदल टाळणे हीदेखील महत्त्वाची जबाबदारी आहे.

२०२६ च्या जागतिक पर्यटन दिनाची डिजिटल कार्यसूची आणि कृत्रिम बुद्धिमत्ता ही संकल्पना महाराष्ट्रातील वारसा पर्यटनाला नवी दिशा देऊ शकते. अजिंठा आणि वेरूळच्या लेण्यांचे डिजिटल दस्तऐवजीकरण, किल्ल्यांचे आभासी दर्शन, बहुभाषिक डिजिटल मार्गदर्शक, ध्वनिमाहिती, डिजिटल नकाशे आणि कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित माहितीसेवा यांचा वापर करता येऊ शकतो. गर्दीचे नियोजन, पर्यटकांच्या हालचालींचे विश्लेषण आणि तुलनेने कमी परिचित पर्यटनस्थळांकडे पर्यटकांचे लक्ष वळविण्यासाठीही डिजिटल साधने उपयुक्त ठरू शकतात. मात्र कृत्रिम बुद्धिमत्तेच्या वापरातून पर्यटन काही मोजक्या प्रसिद्ध स्थळांपुरते केंद्रीत न होता त्याचा लाभ स्थानिक समुदाय आणि उदयोन्मुख पर्यटनस्थळांनाही मिळणे आवश्यक आहे. संयुक्त राष्ट्रांच्या २०२६ च्या संदेशात तंत्रज्ञानाने मानवाची सेवा करावी आणि पर्यटन कामगार, स्थानिक समुदाय व नव्या पर्यटनस्थळांना या बदलाच्या प्रक्रियेत सहभागी केले पाहिजे, यावर भर देण्यात आला आहे. महाराष्ट्रातील जागतिक वारसा स्थळे ही केवळ पर्यटनाची आकर्षणे नाहीत. अजिंठ्याची चित्रकला, वेरूळचे शैलस्थापत्य, घारापुरीची शिल्पपरंपरा, छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनसची वास्तुरचना, मुंबईतील व्हिक्टोरियन गॉथिक आणि आर्ट डेको वास्तू, पश्चिम घाटाची जैवविविधता आणि मराठा मिलिटरी लँडस्केप्समधील दुर्गव्यवस्था हे महाराष्ट्राच्या विविध ऐतिहासिक, सांस्कृतिक आणि नैसर्गिक पैलूंचे प्रतिनिधित्व करतात. या सर्व वारसा स्थळांमधून महाराष्ट्राची ओळख देशाच्या सीमा ओलांडून जगापर्यंत पोहोचते. पर्यटनाच्या माध्यमातून विविध प्रदेशांतील आणि देशांतील लोक या वारशाशी परिचित होतात. त्यामुळे पर्यटन हे केवळ आर्थिक व्यवहार न राहता सांस्कृतिक संवादाचे आणि परस्पर समज वाढविण्याचे माध्यम बनते.

जागतिक पर्यटन दिनाच्या निमित्ताने महाराष्ट्रातील जागतिक वारसा स्थळांकडे केवळ पर्यटक म्हणून पाहणे नव्हे, तर वारशाचे संवर्धक म्हणून पाहण्याची गरज आहे. पर्यटनविकास आणि वारसा संवर्धन हे परस्परविरोधी नसून योग्य नियोजन केल्यास ते परस्परपूरक ठरू शकतात. आधुनिक डिजिटल तंत्रज्ञान, कृत्रिम बुद्धिमत्ता, स्थानिक ज्ञान, वैज्ञानिक संवर्धन, पर्यावरणीय संवेदनशीलता आणि जबाबदार पर्यटन यांची सांगड घातल्यास महाराष्ट्राच्या जागतिक वारशाला अधिक व्यापक आंतरराष्ट्रीय ओळख मिळू शकते. हा वारसा कोणत्याही एका पिढीची मालमत्ता नसून अनेक पिढ्यांनी जतन केलेली मानवतेची सामूहिक संपत्ती आहे. त्यामुळे त्याचा केवळ उपभोग घेणे नव्हे, तर तो सुरक्षित करणे, त्यातून शिकणे आणि पुढील पिढीकडे अधिक सुरक्षित स्वरूपात सुपूर्द करणे ही आपली सामूहिक जबाबदारी आहे. जागतिक वारशातून महाराष्ट्राच्या पर्यटनाला शाश्वत, सर्वसमावेशक, पर्यावरणपूरक आणि स्थानिक समाजाच्या विकासाला हातभार लावणारी दिशा मिळाली, तर जागतिक पर्यटन दिनाचा संदेश खऱ्या अर्थाने सार्थ ठरेल.

(लेखिका, पर्यटन प्रशासनशास्त्राच्या अभ्यासक आहेत)

सायं दैनिक नांदेड वार्ता
* संपर्क कार्यालय *
व्ही.डी.देशपांडे भवन, सोमेश कम्पाऊंड, मिलगेट जवळ, नांदेड-१
मुख्यसंपादक-प्रदीप नागापूरकर, प्रमणध्वनी ९४२२१७४७७४,
सहसंपादक-अविनाश पाटील, प्रमणध्वनी ९४२१९९०८८८
E-mail: nandedwarta@mail.com

# डिव्हायडरवर गुरे,छुपे स्पीड ब्रेकर अन् अपुरे फलक

## वारंगा-हदगाव राष्ट्रीय महामार्गावर वाहनधारक वैतागले

हदगाव/प्रतिनिधी-वारंगा ते हदगाव दरम्यानच्या राष्ट्रीय महामार्गावर वाहतूक सुरक्षेचा प्रश्न गंभीर बनला असल्याच्या तक्रारी वाहनधारक व नागरिकांकडून होत आहेत. काही ठिकाणी डिव्हायडरवर गुरे बांधली जात असल्याने अपघाताचा धोका निर्माण होत असून, स्पष्टपणे न दिसणारे स्पीड ब्रेकर, अपुरे दिशादर्शक फलक आणि आवश्यक उड्डाण पूल वरिल प्रकाशव्यवस्थेचा अभाव यामुळे रात्रीच्या वेळी वाहनचालकांची मोठी गैरसोय होत आहे.

महामार्गावर स्पीड ब्रेकर पूर्वसूचना, रिफ्लेक्टर अथवा पुरेशा संकेत फलकां शिवाय असल्यास भरधाव वाहनांना धोका निर्माण होऊ शकतो. तसेच बाहेरील जिल्हे व राज्यांतून येणाऱ्या वाहनचालकांना मार्गाची स्थानिक माहिती नसल्याने दिशादर्शक फलकांचा अभाव अधिक अडचणीचा ठरत असल्याचे वाहन धारक व नागरिकांचे म्हणणे आहे.मागील आठवड्यात हदगाव शहराजवळ गोजेगाव जवळील दुर्घटनेनंतर प्रश्न गंभीर बनला असून हदगाव शहरा जवळ गोजेगाव परिसरात मागील आठवड्यात झालेल्या जीवघेण्या अपघात दुर्घटनेनंतर महामार्ग सुरक्षेचा मुद्दा पुन्हा ऐरणीवर आला आहे. भविष्यात अशा दुर्घटना टाळण्यासाठी संबंधित यंत्रणेने कागदी कारवाईऐवजी धोकादायक ठिकाणांची प्रत्यक्ष पाहणी करून तातडीने उपाययोजना कराव्यात, अशी मागणी होत आहे.खा. आष्टीकर यांनी राष्ट्रीय महामार्गाच्या अधिकाऱ्यांना फोनवर सूचना न देता प्रत्यक्षात लक्ष घालण्याची मागणी महामार्गावरील सुरक्षेच्या प्रश्नाकडे खा. नागेश पाटील आष्टीकर यांनी लक्ष घालावे, अशी मागणी नागरिक व वाहनधारकांनी केली आहे. NHAI (३६१) अधिकाऱ्यांसोबत प्रत्यक्ष पाहणी करून डिव्हायडरवरील गुरे रोखणे, स्पीड ब्रेकरची तपासणी, आवश्यक ठिकाणी प्रकाशव्यवस्था आणि स्पष्ट दिशादर्शक व डिजिटल सूचना फलक बसविण्याची मागणी जोर धरत आहे.महामार्गाची प्रत्यक्ष पाहणी करून धोकादायक ठिकाणी तातडीने सुरक्षा उपाययोजना कराव्यात, अशी अपेक्षा वाहनधारकांनी व्यक्त केली.

### 'संवाद' केव्हा...!

खा.नागेश पाटील आष्टीकर जिल्हा स्तरावरीलप्रशासनाच्या बैठकीत जिवलग प्रश्नावर प्रश्न मांडताना दिसतात परंतु हदगाव शहरातील व तालुक्यातील केंद्र शासनाच्या अखत्यारीतील तालुक्यात केंद्र शासनाच्या योजना संबंधी तसेच पोस्ट आफीस मधील नागरिकांना होणाऱ्या अडचणी राष्ट्रीय महामार्गावरील होणारे अपघात तसेच हदगाव तालुक्याच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा ठरणार वर्धा -नांदेड रेल्वे प्रकल्प यासंबंधी चर्चा आवश्यक आहे पण यासंबंधी खा. आष्टीकर हे पूर्वी प्रमाणे स्थानिक नागरिक सामाजिक कार्यकर्ते विविध पक्षाचे नेते माध्यमाच्या पत्रकार यांच्याशी संवाद असायच परंतू असा संवाद दिसून येत नाही तालुक्याच्या विकासाच्या दृष्टीने चर्चा करावी अशी अपेक्षा स्थानिय नागरिकाकडून व्यक्त करण्यात येत आहे

# महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे २८ सप्टेंबर रोजी नांदेड दौऱ्यावर

नांदेड- राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे हे सोमवार, दि. २८ सप्टेंबर रोजी नांदेड जिल्ह्याच्या दौऱ्यावर येत आहेत. या दौऱ्यात ते दुष्काळग्रस्त भागातील पीक पाहणी तसेच जिल्हाधिकारी कार्यालयात दुष्काळजन्य परिस्थितीचा आढावा घेणार आहेत. त्यानंतर कंधार तालुक्यातील शिराढोण येथे आयोजित महाआरोग्य शिबिरास उपस्थित राहणार आहेत.

महसूल मंत्री श्री. बावनकुळे हे दुपारी १२ वाजता हिंगोली येथून मोटारीने नांदेडकडे प्रयाण करतील. दुपारी २ वाजता नांदेड जिल्ह्यातील दुष्काळग्रस्त भागातील पीक पाहणी दौऱ्यास उपस्थित राहतील. त्यानंतर दुपारी ३ ते ४ या कालावधीत जिल्हाधिकारी कार्यालय, नांदेड येथे दुष्काळजन्य परिस्थितीचा आढावा घेण्यासाठी आयोजित बैठकीस उपस्थित राहतील. दुपारी ४ वाजता जिल्हाधिकारी कार्यालयातून ते कंधार तालुक्यातील शिराढोण येथील कार्यक्रमस्थळाकडे प्रयाण करतील. दुपारी ४.३० वाजता प्रेरणास्थळ भीमाशंकर विद्यालय परिसर येथे लोकनेते कै. माधवराव पांडागळे यांच्या पूर्णाकृती पुतळा अनावरणानिमित्त आयोजित मोफत महाआरोग्य शिबिर कार्यक्रमास ते उपस्थित राहतील.

# लखमापूर येथे डीजे लावणाऱ्या पाच गणेश मंडळांच्या पदाधिकाऱ्यांविरुद्ध गुन्हे दाखल

माहूर/प्रतिनिधी-तालुक्यातील राष्ट्रीय महामार्गालगतच्या लखमापूर तांडा येथे गणेश विसर्जन मिरवणुकी दरम्यान जिल्हाधिकाऱ्यांच्या आदेशाचे उल्लंघन करून प्रतिबंधित डॉल्बी सिस्टीमचा वापर केल्याप्रकरणी माहूर पोलिसांनी पाच गणेश मंडळांच्या २५ पदाधिकाऱ्यांविरुद्ध गुन्हे दाखल केले आहेत. या कारवाईत डॉल्बी सिस्टीमसह चार आयचर वाहने असा एकूण १ कोटी ३७ लाख रुपयांचा मुद्देमाल पोलिसांनी जप्त केला.

लखमापूर तांडा येथील विसर्जन मिरवणुकीत दोन परवानाधारक आणि तीन विनापरवानाधारक, अशा एकूण पाच गणेश मंडळांचा सहभाग होता. महाराणी गणेश मंडळ आणि साई श्रद्धा गणेश मंडळ या परवानाधारक मंडळांनी जिल्हाधिकाऱ्यांच्या आदेशानुसार डॉल्बी सिस्टीमवर असलेल्या निर्बंधांचे उल्लंघन करून मिरवणुकीत मोठ्या आवाजात ध्वनिवर्धक यंत्रणा वापर करण्यात आला. तसेच, पोलिस निरीक्षक देविदास चोपडे यांनी दिलेल्या लेखी आदेशासह पोलिसांनी दिलेल्या तोंडी सूचनांकडे दुर्लक्ष करून विसर्जन मिरवणूक निर्धारित वेळेत पूर्ण न करता विनाकारण लांबविल्याचेही पोलिसांनी नमूद केले आहे.गरशा गणेश मंडळ, भाया गणेश मंडळ आणि कन्हैया गणेश मंडळ यांनी गणेशमूर्ती स्थापनेसाठी आवश्यक परवानगी नसतानाही मूर्तीची स्थापना केल्याचा, तसेच जिल्हाधिकाऱ्यांच्या जमावबंदी आदेशाचे उल्लंघन करून मोठ्या संख्येने नागरिकांना एकत्रित करून विसर्जन मिरवणूक काढल्याचा आरोप पोलिसांनी केला आहे.कारवाईत पोलिसांनी चार आयचर वाहन ताब्यात घेतले. पोलिसांच्या प्राथमिक अंदाजानुसार जप्त करण्यात आलेल्या मुद्देमालाची एकूण किंमत १ कोटी ३७ लाख रुपये आहे. या प्रकरणी पाच गणेश मंडळाच्या २५ पदाधिकाऱ्यां विरुध्द गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. पुढील तपास उपविभागीय पोलीस अधिकारी किरण कुमार भोंडवे आणि पोलीस निरीक्षक देविदास चोपडे यांच्या मार्गदर्शनाखाली सपोनी शरद घोडके करीत आहेत. पोलिसांच्या कारवाईमुळे लखमापूर परिसरात मोठी खळबळ उडाली आहे.



# बौद्धीक संपदा अधिकारावर सायन्स महाविद्यालयात कार्यशाळा

नांदेड/प्रतिनिधी-नांदेड एज्युकेशन सोसायटीच्या सायन्स कॉलेज, नांदेडच्या अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षातर्फे भारत सरकारच्या नागपूर येथील राजीव गांधी राष्ट्रीय बौद्धिक संपदा व्यवस्थापन संस्थेच्या सहकार्याने बौद्धिक संपदा अधिकार व नवशिक्यांसाठी पेटंट/डिझाईन फायलिंग या विषयावर एकदिवसीय राज्यस्तरीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे.

ही कार्यशाळा २८ सप्टेंबर रोजी सकाळी ११ वाजता सायन्स कॉलेज, नांदेड येथील कै. पुरणमल लाहोटी सभागृहात होणार आहे. राष्ट्रीय बौद्धिक संपदा जागरूकता अभियान अंतर्गत आयोजित या कार्यशाळेत बौद्धिक संपदा अधिकारांचे विविध पैलू, पेटंट, डिझाईन, कॉपीराइट व ट्रेडमार्क तसेच त्यांच्या नोंदणी प्रक्रियेबाबत मार्गदर्शन करण्यात येणार आहे. विद्यार्थी, संशोधक, प्राध्यापक तसेच उद्योग क्षेत्रातील व्यावसायिकांमध्ये बौद्धिक संपदा अधिकारांविषयी जागरूकता निर्माण करणे आणि संशोधनातून निर्माण होणाऱ्या नावीन्यपूर्ण कल्पनांना पेटंट व डिझाईनच्या माध्यमातून संरक्षण मिळवून देणे, हा कार्यशाळेचा प्रमुख उद्देश आहे. कार्यशाळेत सहभागी होण्यासाठी इच्छुकांनी ऑनलाइन नोंदणी करावी, असे आवाहन प्राचार्य डॉ. एल. एल. शिंदे, डॉ. पी. एस. बोरकर, डॉ. व्ही. एन. नरवाडे तसेच यांनी केले आहे.

# उपवर्गीकरणासाठी २९ सप्टेंबरला मातंग समाजाचा मुंबईत महामोर्चा

नांदेड/प्रतिनिधी-अनुसूचित जाती आरक्षणामध्ये उपवर्गीकरण करून मातंग समाजासह आरक्षणाच्या लाभापासून वंचित घटकांना न्याय्य वाटा मिळावा, या मागणीसाठी दि. २९ सप्टेंबर रोजी मुंबईतील आझाद मैदानावर निर्धार महामोर्चाचे आयोजन करण्यात आले आहे. या महामोर्चात राज्यभरातून दहा लाखांहून अधिक समाजबांधव सहभागी होणार असल्याचा दावा सकल मातंग समाज व विविध संघटनांनी केला आहे.

सर्वोच्च न्यायालयाच्या दि.१ ऑगस्ट २०२४ रोजीच्या पंजाब राज्य व्ही.दविंदरसिंध निकालानंतर अनुसूचित जाती-जमातींच्या आरक्षणात उपवर्गीकरणाचा घटनात्मक मार्ग खुला झाला आहे. त्यासाठी वस्तुनिष्ठ आधार व अनुभवजन्य आकडेवारी आवश्यक असल्याचे न्यायालयाने स्पष्ट केले आहे. या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र सरकारने उपवर्गीकरणाबाबत पारदर्शक प्रक्रिया राबवून ठोस निर्णय घ्यावा, अशी मागणी समाजाच्या वतीने करण्यात आली आहे.मातंग समाजाच्या म्हणण्यानुसार, गेल्या चार दशकांपासून उपवर्गी-करणासाठी संघर्ष सुरू आहे. राज्यभरात आंदोलने व मोर्चे काढूनही अद्याप ठोस निर्णय झालेला नसल्याने २५ सप्टेंबरपर्यंत सरकारने निर्णय घ्यावा, अशी मागणी करण्यात आली होती. निर्णय न झाल्यास २९ सप्टेंबरला मुंबईत महामोर्चा काढण्याचा इशारा देण्यात आला आहे. दरम्यान, नांदेड जिल्ह्यात तालुकानिहाय व गावनिहाय जनजागृती आणि मुंबई महामोर्चाच्या नियोजनाला वेग आला आहे. युवक, महिला, सामाजिक कार्यकर्ते, अधिकारी-कर्मचारी तसेच सर्वपक्षीय कार्यकर्त्यांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन करण्यात आले आहे. वैयक्तिक व राजकीय मतभेद बाजूला ठेवून समाजहितासाठी एकत्र येण्याचे आवाहन सकल मातंग समाजाचे समन्वयक ॲड. गणेश तादलापूरकर यांनी केले आहे.

# नरसी येथे विघ्नहर्ता गणेश मंडळाच्या रक्तदान शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद

नायगाव/प्रतिनिधी-नरसी येथील श्री विघ्नहर्ता गणेश मंडळाच्या वतीने रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले. सामाजिक बांधिलकी जपत आयोजित करण्यात आलेल्या या शिबिरात नागरिक व युवकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत रक्तदान केले.

यावेळी पत्रकार गणेश पाटील कंदुरके, माजी जिल्हा परिषद सदस्य माणिकराव लोहगावे यांच्यासह गणेश मंडळाच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी रक्तदान करून सामाजिक उपक्रमात सहभाग नोंदविला. गरजू रुग्णांना वेळेवर रक्त उपलब्ध व्हावे, यासाठी नागरिकांनी नियमित रक्तदान करण्याचे आवाहन यावेळी करण्यात आले. शिबिराच्या आयोजनासाठी मंडळाचे अध्यक्ष शिवराज पा. बामणीकर, उपाध्यक्ष बालाजी पेंटे, संतोष सावकार जुकलकर, योगेश चौधरी, योगेश गंभीरे, शाम चोंडे, गणेश टोम्पे, उत्तम पा. बोधने, बालाजी पा. सोरटे, अंबादास कोकणे, चंद्रकांत इबितदार, मदन पाटील, संभाजी इभुते, राजू वसमते, सुभाष पा. मुंके, बसवंत पाटील मुंके, अनिल श्रीरामवार, नारायण देवसेटवार, श्रीनिवास मेटकर, चंद्रकांत काचामवार आदी पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले.रक्तदान कराजीवन वाचवा! असा सामाजिक संदेश देत शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.



# अंबाडी येथे विदेशी दारु जप्त

नांदेड/प्रतिनिधी-मौजे अंबाडी ता.किनवट येथे शुक्रवारी सकाळी पोलीसांनी धाड टाकुन साडेचार हजार रुपयांची विदेशी दारु जप्त केली आहे. रामप्रसाद दर्शनलाल जयस्वाल रा.अंबाडी हे विनापरवाना विदेशी दारु विक्री करीत असतांना शुक्रवारी सकाळी पोलीसांनी रंगेहाथ पकडले. त्यांच्या जवळून साडेचार हजार रुपयांची दारु जप्त केली आहे. याप्रकरणी किनवट पोलीस ठाण्यात रामप्रसाद जयस्वाल यांच्या विरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे.


## जाहीर प्रगटन

मे.सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर,कंधार यांचे न्यायालयात
किरकोळ दिवाणी अर्ज क्र.३५५/२०२६
(CNR No.MHND10011922026)

अर्जदार : १. पूजा भ्र.देविचंद ढवळे वय ३३ वर्षे, व्यवसाय-घरकाम, २. सुकुमारबाई भ्र.बाबुराव ढवळे वय ६२ वर्षे, व्यवसाय-घरकाम, ३. दिक्षा पि.देविचंद ढवळे वय ११ वर्षे, व्यवसाय-शिक्षण अ.पा.क.पूजा देविचंद ढवळे, ४. बाबी पि.देविचंद ढवळे वय ०५ वर्षे, व्यवसाय : शिक्षण रा.सर्व कुरुळा ता.कंधार जि.नांदेड

विरुद्ध

गैरअर्जदार : निरंक

प्रकरण : अर्जदार यांना बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ मधील कलम २ प्रमाणे वारसा प्रमाणपत्र मिळणेबाबत.

ज्याअर्थी वरील अर्जदार क्र.१ ही पत्नी तर अर्जदार क्र.३ व ४ ही मुले आहेत. अर्जदार क्र.२ मयताची आई आहे. मयत नामे देवचंद बाबुराव ढवळे यांचा मृत्यू दिनांक २८/०१/२०२६ रोजी मौ.रा. गोगदरी ता.कंधार जि.नांदेड येथे झाला आहे.

उपरोक्त अर्जदार यांना मयत देवचंद बाबुराव ढवळे यांचे वारस असल्याबाबत यांच्या पक्षात शासकीय व निमशासकीय कार्यालयामध्ये वारसा प्रमाणपत्राची आवश्यकता असल्याने वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी या न्यायालयात अर्ज केला आहे.

त्याअर्थी सर्व जनतेस व हितसंबंधीतांना या जाहीर प्रगटनाद्वारे सूचित करण्यात येते की, उपरोक्त अर्जदार यांना मयत देवचंद बाबुराव ढवळे यांचे वारस म्हणून वारसा प्रमाणपत्र देण्यास कोणास आक्षेप किंवा उजर असेल तर हे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसात किंवा तत्पुर्वी या न्यायालयात स्वतः अथवा वकिलामार्फत हजर राहुन आपला आक्षेप नोंदवावा अन्यथा कोणाचाही आक्षेप नाही असे समजून योग्य तो हुकुम पारीत केला जाईल याची नोंद घ्यावी.

प्रकरणाची पुढील तारीख - २६/१०/२०२६

आज रोजी दिनांक २४/०९/२०२६ रोजी माझ्या सही व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

स्वाक्षरित/-
**कनिष्ठ लिपीक**
सह दिवाणी न्यायालय
क.स्तर,कंधार

आदेशावरुन
स्वाक्षरित/-
**सहायक अधिक्षक**
सह दिवाणी न्यायालय क. स्तर,कंधार

## जाहीर प्रगटन

नांदेड येथील ३ रे सह दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर, नांदेड
यांच्या न्यायालयात
(समक्ष के.बी.सोनवणे)
दिवाणी किरकोळ अर्ज (आर.जे.ई.) क्र.१३८६/२०२६

अर्जदार : १) व्यंकट पि.प्रभु रामतिर्थे वय : ६० वर्षे, धंदा : सेवानिवृत्त रा.प्लॉट नं.२६ गजानन नगर, विष्णुपुरी नांदेड ता.जि.नांदेड मो.नं.९३२३१३९१६८, २) विक्रम पि.व्यंकटराव रामतिर्थे वय : ३६ वर्षे, धंदा : शिक्षण रा.घर नं.६३२ गजानन नगर, विष्णुपुरी नांदेड ता. जि. नांदेड मो.नं.७३८३९५१७३५०४, ३) दिपक पि.व्यंकटराव रामतिर्थे वय : ३४ वर्षे, धंदा : शिक्षण रा.अजिंक्य निवास, लातूर रोड, जवळ मराठवाडा ग्रामीण बँक विष्णुपुरी नांदेड

विरुद्ध

गैरअर्जदार : निरंक

दावा : बॉम्बे रेग्युलेशन कायदा कलम २ व ३ प्रमाणे वारसा प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्याअर्थी अर्जदाराने या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. वरील अर्जदार मयत कल्पना भ्र. व्यंकटराव रामतिर्थे यांचे वारस आहेत. मयत कल्पना भ्र.व्यंकटराव रामतिर्थे यांचा मृत्यु दि.०२/०१/२०२६ रोजी झाला आहे. वर नमुद अर्जदार क्र.१ ते ३ या शिवाय मयतास इतर कोणीही कायदेशीर वारसदार नसल्याचे अर्जदाराने अर्जात कथन केले आहे.

तरी प्रस्तुत प्रकरणी अर्जदाराच्या नावे वारसा प्रमाणपत्र देण्यास कोणास काही आक्षेप असल्यास त्यांनी तो स्वतः हजर राहुन या न्यायालयात दि.०७/११/२०२६ रोजी किंवा एक महिण्याच्या आत नोंदवावा. मुद्दतीनंतर येणाऱ्या आक्षेपाचा विचार करण्यात येणार नाही. व अर्जाची पुढील सुनावणी करण्यात येईल.

आज दिनांक २३/०९/२०२६ रोजी माझ्या सहीनिशी व या न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

स्वाक्षरित/-
**कनिष्ठ लिपीक**
३ रे सह दिवाणी न्यायालय
क.स्तर,नांदेड

आदेशावरुन
स्वाक्षरित/-
**सहायक अधिक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर,नांदेड

## CHANGE IN NAME

My (old name) is **NABEEHA FATEMA** which now I am, changing as (new name) **NABEEHA FATEMA MOHAMED NUSRATH**

Hence, forth my all correspondance will be done as per my new name. please consider the same.

Sign by
**NABEEHA FATEMA MOHAMED NUSRATH**
R/o 5-1-319, Fateh buruj, near old water tank,
Itwara Nanded-431604
M. No.-9172008841

## तालुका दंडाधिकारी तथा तहसीलदार कंधार यांचे कार्यालय

Email Id:tahkadhar@gmail.com जा.क्रं.२०२६/ज.मृ.नों./कावी
दुरध्वनी क्र.२२३१००-०२४६६ दिनांक - १२/०८/२०२६

**(जन्म मृत्यू शाखा)**

## जाहीर प्रगटन

याद्वारे प्रगटन देण्यात येते की अर्जदार वाघमारे सर्जेराव विठ्ठल रा.हाळदा ता.कंधार जि.नांदेड यांनी या कार्यालयात त्यांचा मुलगा मुकेश सर्जेराव वाघमारे रा हाळदा ता.कंधार जि.नांदेड यांचे जन्म/मृत्यू प्रमाणपत्र मिळण्यासाठी आदेश होण्याकरिता मागणी केली आहे.

जन्म/मृत्यू झालेंल्या चे नाव मुकेश सर्जेराव वाघमारे रा.हाळदा ता. कंधार या ठिकाणी दिनांक १०/०६/२००८ या दिवशी जन्म/मृत्यू झाला असून प्रमाणपत्र मिळण्याकरिता आदेश होणे करिता सदर तहसील कार्यालय कंधार येथे दिनांक १०/०८/२०२६ रोजी अर्ज सादर केला आहे.

वरील जन्म/मृत्यू दिनांक बाबत कोणाचा आक्षेप असल्यास हे प्रगटन प्रसिद्ध झालेपासून पंधरा (१५) दिवसाच्या आत आपला लेखी आक्षेप तहसील कार्यालय कंधार येथे सादर करावा. दिलेल्या मुदतीनंतर आक्षेपाचा विचार केला जाणार नाही.

स्वाक्षरित/-
तहसीलदार कंधार

## CHANGE IN NAME

My (old name) is **SIRAJUDDIN** which now I am, changing as (new name) **SIRAJODDIN KIYAMODDIN KAZI**

Hence, forth my all correspondance will be done as per my new name. please consider the same.

Sign by
**SIRAJODDIN KIYAMODDIN KAZI**
R/o Noori chowk athawadi bazar,
Kalamnuri Dist.Hingoli-431702
M. No.-8530968482

## CHANGE IN NAME

My (old name) is **MOHAMMAD KHALED** which now I am, changing as (new name) **MOHAMMED KHALID MOHAMMED ABID ALI**

Hence, forth my all correspondance will be done as per my new name. please consider the same.

Sign by
**MOHAMMED KHALID MOHAMMED ABID ALI**
R/o Nizam colony, near masjid
khawajgan, Shreenagar Taroda bk
Nanded-431605
M. No.-9890168552

## CHANGE IN NAME

My (old name) is **MOHAMED NUSRATH** which now I am, changing as (new name) **MOHAMED NUSRATH MOHAMED JEELANI**

Hence, forth my all correspondance will be done as per my new name. please consider the same.

Sign by
**MOHAMED NUSRATH MOHAMED JEELANI**
R/o 5-1-319, Fateh buruj, near old water tank,
Itwara Nanded-431604
M. No.-9172008841

## दुष्काळी तालुक्यात वाढ होण्याची शक्यता

मुंबई/प्रतिनिधी-मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज, शनिवारी (२६ सप्टेंबर) राज्यात दुष्काळ जाहीर केला आहे. महाराष्ट्रातील तब्बल २६५ तालुक्यांमध्ये दुष्काळ असल्याची घोषणा मुख्यमंत्र्यांनी केली आहे. राज्यात एकूण ३५८ तालुके आहेत. त्यातील २६५ म्हणजेच ७५ टक्के महाराष्ट्र दुष्काळग्रस्त असल्याचे सरकारने जाहीर केले आहे. महसूल मंत्री यांनी महत्त्वाचे विधान केले आहे. २६५ तालुके दुष्काळग्रस्त असल्याचा राज्य सरकारचा प्राथमिक जीआर आहे. या तालुक्यांमध्ये वाढ होऊ शकते, असे त्यांनी स्पष्ट केले आहे.

# कचरा नाल्यात,विकास निधी कागदावर;बोधडी ग्रामपंचायतीच्या कारभारावर युवा कार्यकर्त्यांचा घणाघात

किनवट/प्रतिनिधी- बोधडी बु. ग्रामपंचायतीच्या भ्रष्ट कारभाराविरुद्ध युवा कार्यकर्त्यांनी मागील ग्रामसभेत कडाडून आक्षेप घेतल्याने संबंधितांनी समर्पक उत्तरे न देता चक्क ग्रामसभाच गुंडाळावी लागली, उल्लेखनीय म्हणजे ग्राम पंचायत अधिकाऱ्याने दांडी मारली होती. २ ऑक्टोबर रोजीच्या ग्रामसभेला ग्राम पंचायत अधिकारी उपस्थित राहतील याची तजवीज करावी. अशी मागणी एका शिष्टमंडळाने निवेदनाद्वारे गटविकास अधिकारी यांच्याकडे केली आहे.

सरपंचांसह सतरा सदस्यीय असलेल्या ग्रामपंचायतीला घनकचरा साठवणुकीसाठी डम्पिंग ग्राउंड नसल्याने गावालगतच्या नाल्याच्या पाणीपात्रात कचरा टाकून दूर्गंधी पसरवून जनारोग्याला बाधा पोहोचविला जात आहे. अशा विविध मागण्यांचे २५ सप्टेंबर रोजी शिष्टमंडळाने गटविकास अधिकाऱ्यांना निवेदन सोपवले. २०२५-२६ या आर्थिक वर्षातील खातेनिहाय चौकशी करून कारवाई करण्याची मागणी सुद्धा केली आहे. सतरा हजार लोकवस्तीच्या आसपास आणि सरपंचांसह सतरा सदस्यीय असलेल्या बोधडी बु. ग्रामपंचायतीचा कार्यभार पारदर्शक नसल्यामुळे युवा कार्यकर्त्यांनी आक्रमक पवित्रा घेतला असून ग्रामसभेच्या माध्यमातून सत्ताधाऱ्यांसह ग्रामपंचायत अधिकाऱ्यांना जाब विचारला जात आहे. १५ ऑगस्ट रोजीच्या ग्रामसभेत या युवा कार्यकर्त्यांनी प्रत्येक कामकाजाच्या वर्मावर बोट ठेऊन



प्रश्नांचा भडीमार केल्याने नागरिकांना समर्पक उत्तरे देण्यास संबंधित असमर्थ ठरल्याने युवा शिष्टमंडळ पुन्हा आक्रमक झाले असून २५ सप्टेंबर रोजी विविध मागण्यांचे निवेदन गटविकास अधिकाऱ्यांकडे सादर केले आहे. जिल्हाधिकारी, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांसह सर्व संबंधितांकडे न्याय मागणी घेऊन दाद मागणार असल्याचे त्यांनी सांगितले. दहा लाखांचा निधी उचल करून हात पुसले परंतु घनकचरा व्यवस्थापनासाठी डम्पिंगग्राउंड उपलब्ध करू शकले नाहीत. गावालगतच्या नाल्यातील पाणीपात्रात संपूर्ण घनकचऱ्याची विल्हेवाट लावली जात आहे. परिणाम नालापात्रातील पाणी दुषित केले आहे. पसरलेल्या दूर्गंधीमुळे सभोवतालच्या नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. याची जिम्मेदारी निश्चित करुन कारवाई करण्याची संतप्त शिष्टमंडळाने मागणी केली आहे. पाणी फिल्टर दुरुस्तीसह तत्सम कामे दाखवून १७ लाखाला चुना लावलाय. सिमेंट बाकड्यावर ३ लाखांचा खर्च, अशी अनेक मुद्दे आहेत की कागदोपत्री कामे करून विकास निधी स्वाहा केल्याचा गंभीर आरोप करण्यात आलाय. मातोश्री पांदण योजनेतून रस्ते तयार करण्याची ग्रामस्थांनी मागणी केल्यानंतरही त्याबद्दलची अनास्था ही सार्वजनिक विकासाला मारक ठरली असल्याचा घणाघात युवा शिष्टमंडळाने केला आहे. २ ऑक्टोबरच्या ग्रामसभेकडे गटविकास अधिकाऱ्यांचे लक्ष केंद्रित करण्यासाठी जाणीवपूर्वक मुद्दा उपस्थित केला खरा परंतु ग्राम पंचायत अधिकारी उपस्थित राहणार की मागची पुनरावृत्ती करणार. कारण पै पै चा हिशोब नागरिकांना द्यावा लागणार असल्याचे शिष्टमंडळाने सांगितले. दरम्यान या संबंधाने ग्राम पंचायत अधिकाऱ्यांशी संपर्क करण्याचा प्रयत्न केला मात्र तो होऊ शकला नाही.

# राम चौधरी मित्रमंडळाच्यावतीने श्री विसर्जन मिरवणुकीत भाविकांना मिष्ठान्न वाटप

मुदखेड/प्रतिनिधी-शहरातील प्रमुख मार्गावरून दरवर्षीप्रमाणे यंदाही श्री गणेश विसर्जन मिरवणूक उत्साह, भक्तिभाव आणि शिस्तबद्ध वातावरणात पार पडली. माजी नगराध्यक्ष राम चौधरी मित्र मंडळाच्यावतीने गणेश भक्तांना मिष्ठान्न वाटप करण्यात आले.

यंदाच्या विसर्जन मिरवणुकीत शहरातील विविध राजकीय पक्षांचे कार्यकर्ते, सामाजिक संघटना आणि गणेश मंडळांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. यावेळी ज्येष्ठ नेते राम चौधरी यांनी गेल्या अनेक वर्षांपासून सुरू असलेली मिष्ठान्न वाटपाची परंपरा यंदाही कायम ठेवली. कोणताही गाजावाजा, पोस्टरबाजी किंवा राजकीय प्रदर्शन न करता राम चौधरी मित्रमंडळाच्या वतीने मिरवणुकीत सहभागी झालेल्या हजारो श्रीभक्तांना मिष्ठान्नाचे वाटप करण्यात आले. गणेशभक्तांची सेवा करण्याच्या या उपक्रमाला भाविकांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. या उपक्रमात राम सोनी, लक्ष्मण सोनटक्के, प्रवीण गायकवाड, सुमित चिद्रावार, संदीप लोखंडे, वड्डे, वाढे, येरपलवाड आदींसह राम चौधरी मित्रमंडळाच्या कार्यकर्त्यांनी उत्स्फूर्त



सहभाग घेतला. हजारो भाविकांना मिष्ठान्नाचे वाटप करत कार्यकर्त्यांनी मनोभावे सेवा बजावली.

# विजेच्या समस्येचा प्रश्न थेट मुख्यमंत्र्यांच्या दरबारी; तरुणाच्या तक्रारीनंतर थेट मंत्रालयातून चक्र हलली

मांडवी/प्रतिनिधी-कनकी उपकेंद्रा अंतर्गत येणाऱ्या कोठारी सिंद फिडरवरील गंभीर वीज समस्येमुळे हैराण झालेल्या ग्रामस्थांना न्याय मिळवून देण्यासाठी रामजी नाईक तांडा येथील तरुण सामाजिक कार्यकर्ते राजेश श्याम राठोड यांनी थेट मंत्रालयाचे दरवाजे ठोठावले आहेत. त्यांच्या या एका धडाडीच्या निर्णयामुळे आता हा प्रश्न थेट राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या दरबारी पोहोचला आहे.

किनवट तालुक्यातील मौजे कोठारी सिंद, जमुना नगर, हिरापूर, रामजी नाईक तांडा आणि गणेशपूर येथील नागरिक व शेतकरी मागील एका महिन्यापासून कमी दाबाच्या आणि अनियमित वीज पुरवठ्यामुळे त्रस्त आहेत. घरातील विद्युत उपकरणे जळणे, पिण्याच्या पाण्याचा प्रश्न निर्माण होणे आणि सिंचनाअभावी उभी पिके सुकूलागल्याने शेतकरी आर्थिक संकटात सापडले आहेत.स्थानिक स्तरावर वारंवार पाठपुरावा करूनही तोडगा निघत नसल्याचे पाहून तरुण कार्यकर्ते राजेश राठोड यांनी १५ सप्टेंबर रोजी थेट राज्याचे मृद व जलसंधारण मंत्री संजय राठोड यांच्या कडे गावातील वीज संकटाची भीषण वास्तवता त्यांच्यासमोर निवेदनातून मांडली.गावातील एका तरुणाने दाखवलेली ही सजगता आणि ग्रामस्थांची होणारी होरपळ पाहून मंत्री संजय राठोड यांनीही या विषयाची अत्यंत गांभीर्याने दखल घेतली. त्यांनी २२ सप्टेंबर रोजी थेट मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पत्र लिहून या प्रकरणात तातडीने हस्तक्षेप करण्याची विनंती केली.या पत्रात महावितरणच्या अधिकाऱ्यांमार्फत वीज पुरवठ्याची तात्काळ पाहणी करणे, कमी दाबाची कारणे शोधणे आणि आवश्यकतेनुसार नवीन ट्रान्सफॉर्मर बसवून किंवा दुरुस्ती करून यंत्रणेची क्षमता वाढवण्याचे स्पष्ट निर्देश महावितरणला देण्यात यावेत, अशी आग्रही शिफारस करण्यात आली आहे. एका तरुणाने स्थानिक प्रश्नासाठी थेट मंत्र्यांपर्यंत मारलेली धडक आणि त्यानंतर थेट मुख्यमंत्र्यांकडे गेलेला हा विषय सध्या संपूर्ण परिसरात चर्चेचा विषय ठरला आहे.

# दुष्काळाच्या यादीत मुखेड गायब; स्थानिक नेतृत्वाविरुध्द शेतकऱ्यांचा आक्रोश

मुखेड/प्रतिनिधी-महाराष्ट्र शासनाच्या २५ सप्टेंबर २०२६ रोजीच्या शासन निर्णयानुसार राज्यातील २६५ तालुक्यांमध्ये ट्रिगर-१ (प्रथम कळ) लागू करण्यात आला आहे. मात्र, नांदेड जिल्ह्यातील १४ तालुक्यांचा समावेश असताना मुखेड तालुक्याचे नाव या यादीत नसल्याने ही यादी पाहून मुखेडच्या शेतकऱ्यांमध्ये संतापाची भावना निर्माण झाली आहे. शासनाने मुखेड तालुका सुद्धा दुष्काळग्रस्त जाहीर करून शेतकऱ्यांना दिलासा द्यावा अन्यथा तीव्र आंदोलन करण्यात येईल असा इशारा जि. प. चे माजी अध्यक्ष दिलीप पाटील बेटमोगरेकर व शेतकरी नेते शिवशंकर पाटील कलंबरकर यांनी दिला आहे.

शासनाच्या अधिकृत यादीत नांदेड जिल्ह्यातील नांदेड, बिलोली, कँधार, लोहा, हदगाव, भोकर, देगलूर, किनवट, हिमायतनगर, माहूर, धर्माबाद, उमरी, अर्धापूर आणि नायगाव या १४ तालुक्यांचा समावेश करण्यात आला आहे. मात्र मुखेडचा उल्लेखच नसल्याचे शासन निर्णयातील परिशिष्ट-१ वरून स्पष्ट होते.एकीकडे शेतकऱ्यांच्या पिकांवर संकटाचे सावट असताना दुसरीकडे शासनाच्या दुष्काळी यादीतच मुखेडचा समावेश नसणे हा अत्यंत गंभीर विषय आहे. शासनाच्या निकषांमध्ये मुखेड का बसत नाही? मुखेडची प्रत्यक्ष पिकांची परिस्थिती शासनाच्या निदर्शनास आणून दिली आहे का? तालुक्याचा वस्तुनिष्ठ अहवाल शासनाकडे पाठविण्यात आला आहे का ? आणि सर्वांत महत्त्वाचे म्हणजे मुखेडला दुष्काळी यादीत समाविष्ट करण्यासाठी स्थानिक आ.डॉ.तुषार राठोड यांनी काय भूमिका घेतली अशी विचारणा आज दिवसभर सोशल मीडियाच्या माध्यमातून विचारली जात आहे.

# जि.प.लेखा कर्मचारी संघटनेचे २८ रोजी काळ्या फिती लावून आंदोलन

नांदेड/प्रतिनिधी-चंद्रपूर येथील जिल्हा परिषदमध्ये कार्यरत लेखा व वित्त अधिकारी अतुलकुमार गायकवाड यांनी लेखा विभागातील कर्मचाऱ्यांना अर्वाच्य भाषेत शिवीगाळ करुन हिन वागणूक देत असल्याच्या निषेधार्थ जि.प. लेखा कर्मचारी संघटनेच्यावतीने सोमवार दि.२८ रोजी राज्यात कर्मचारी काळ्या फिती लावून आंदोलन करणार आहेत.

चंद्रपूर जिल्हा परिषदेमधील लेखा व वित्त अधिकारी अतुलकुमार गायकवाड हे लेखा विभागात कार्यरत विविध पदावरील कर्मचाऱ्यांना मानसीक त्रास देत आहेत. अर्वाच्य भाषेत शिवीगाळ करणे, जाणिवपूर्वक त्रास देणे, कर्मचाऱ्यांकडे सोपविलेल्या कार्याची कार्यासने वारंवार बदलत असतात. अतुलकुमार गायकवाड यांच्याविषयी शासनाकडे तक्रार करण्यात आली होती. शासनाने त्यांची इतर ठिकाणी बदली केली. परंतु गायकवाड यांनी मॅटमध्ये जावून स्थगिती मिळविली आहे. अतुलकुमार गायकवाड हे कर्मचाऱ्यांना हिन दर्जाची वागणूक देत असल्याच्या निषेधार्थ सोलापूर येथे झालेल्या राज्य अधिवेशनात राज्यभरात आंदोलन करण्याचा निर्णय घेण्यात आला होता. महाराष्ट्र राज्य जिल्हा परिषद लेखा



कर्मचारी संघटनेचे राज्याध्यक्ष मिलिंद कांबळे, राज्य सरचिटणीस प्रशांत सुतार, राज्य कार्याध्यक्ष पवन तलवारे, संजय महाळकर, राज्य कोषाध्यक्ष चंद्रशेखर फसाळे यांच्या नेतृत्वाखाली सोमवार दि.२८ रोजी जिल्हा परिषदेतील लेखा विभागातील कर्मचारी काळ्या फिती लावून आंदोलन करणार आहेत. या संदर्भात संघटनेचे अध्यक्ष सय्यद मिनाज यांच्या नेतृत्वाखाली एका शिष्टमंडळाने जि.प.चे सीईओ (सामान्य प्रशासन) व मुख्य लेखा वित्त अधिकारी यांना निवेदन दिले. यावेळी मधुकर मोरे, लक्ष्मीकांत मोटरवार, किशोर जाधव, राजेश जोंधळे, प्रमोद गायकवाड यांच्यासह इतर पदाधिकारी उपस्थित होते.

# चिखलीत वनविभागाकडून सागवानचे ३४ नग जप्त

किनवट/प्रतिनिधी-गुप्त माहितीच्या आधारे वन विभागाने धडक कारवाई करत चिखली (बु) येथे बेवारस स्थितीत असलेला अवैध सागवान साठा जप्त केला आहे. ही कारवाई २६ सप्टेंबर रोजी पार पडली.

मिळालेल्या माहितीनुसार, चिखली (बु) परिसरात अवैध सागी कटसाईज लाकूड लपवून ठेवल्याची गुप्त माहिति वन विभागाला मिळाली होती. या माहितीच्या आधारे पथकाने तातडीने घटनास्थळी धाव घेऊन पाहणी केली असता, त्या ठिकाणी बेवारस स्थितीत सागी कटसाईजचे एकूण ३४ नग आढळून आले. ही यशस्वी कारवाई नांदेडचे उपवनसंरक्षक संदिप चव्हाण आणि सहाय्यक वनसंरक्षक के. पी. चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. या मोहिमेत किनवटचे वनपरिक्षेत्र अधिकारी (प्रा) धीरज मदने, फिरत्या पथकाचे वनपरिक्षेत्र अधिकारी एन. एन. केंद्रे, चिखली वन परिमंडळाचे वनपाल बी. टी. जाधव, अंबाडी किनवटच्या वनपाल मीरा टोम्पे, वनरक्षक एस. एम. यादव, रवि



दांडेगावकर, ओम शिंदे, संघशीला काकडे तसेच वाहन चालक बाळकृष्ण आवले व अनिल लाखाडे यांनी सहभाग नोंदवला.अवैध लाकूड तस्करी करणाऱ्यांचा शोध सुरू असून वन विभागाच्या या कारवाईमुळे परिसरातील लाकूड तस्करांचे धाबे दणाणले आहेत.

# राम मंदिर देणगी चोरीत चंपत राय यांना दिलासा!

अयोध्या:अयोध्येतील राम मंदिर देणगी चोरी प्रकरणात विशेष तपास पथकाने (एसआयटी) अखेर आरोपपत्र दाखल केले असून, त्यात श्री राम जन्मभूमी तीर्थ क्षेत्र ट्रस्टचे माजी सरचिटणीस चंपत राय यांना आरोपी करण्यात आलेले नाही. त्यांच्यासह माजी विश्वस्त डॉ.अनिल मिश्रा आणि गोपाल राव यांची अभियोजन पक्षाचे साक्षीदार म्हणून नोंद करण्यात आली आहे.

एसआयटीने सुमारे ७० हजार पानांचे आरोपपत्र दाखल केले असून, देणगी मोजणी दरम्यान चोरी केल्याच्या आरोपावरून आठ कर्मचाऱ्यांना आरोपी करण्यात आले आहे. तपासात आरोपींकडून सुमारे ७९ लाख ८५ हजार रुपयांची रोकड जप्त करण्यात आल्याची माहिती आहे. देणगी मोजणी प्रक्रियेत गैरप्रकार झाल्याचे तपासात निष्पन्न झाले असले तरी चंपत राय, अनिल मिश्रा आणि गोपाल राव यांचा चोरीत थेट किंवा अप्रत्यक्ष सहभाग आढळला नसल्याचे एसआयटीने नमूद केले आहे. त्यामुळे आरोपपत्रात त्यांना आरोपी न करता साक्षीदार करण्यात आल्याने चंपत राय यांना मोठा दिलासा मिळाला आहे.

पान १ वरुन

## नांदेड जिल्ह्यातील चौदा...

परिस्थिती मुदखेड तालुक्यातील शेतकऱ्यांची असतांना शासनाने शेतकऱ्यांना धीर देण्यापेक्षा एकप्रकारे अन्यायच केला आहे. मुखेड तालुका हा डोंगराळ भाग म्हणून ओळखला जातो. या तालुक्यात कोरडवाहू शेती मोठ्या प्रमाणात केली जाते. या तालुक्यात दुष्काळाची परिस्थिती गंभीर असतांना शासनाने मुखेड तालुक्याला दुष्काळाच्या यादीतून वगळले. मुखेडचे भाजपा आ.डॉ.तुषार राठोड हे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे निकटवर्तीय म्हणून ओळखले जातात. त्यांच्याच मतदारसंघाला दुष्काळातून वगळण्यात आल्याने आ.तुषार राठोड यांच्या विषयी मुखेड तालुक्यात संताप व्यक्त केला जात आहे.

## दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना...

उपमुख्यमंत्री श्रीमती सुनेत्रा अजित पवार यांनी शेतकरी व महिला शेतकऱ्यांशी संवाद साधत त्यांच्या व्यथा ऐकून घेतल्या. राज्य शासन या संकटात पूर्णपणे तुमच्यासोबत आहे. सर्वतोपरी मदत केली जाईल, असा धीर देत दिलासा दिला. यावेळी परिसरातील शेतकरी, नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

CHANGE IN NAME

My (old name) is **MOHAMED NUSRAT** which now I am, changing as (new name) **MOHAMED NUSRATH MOHAMED JEELANI**

Hence, forth my all correspondance will be done as per my new name. please consider the same.

Sign by

**MOHAMED NUSRATH MOHAMED JEELANI**

R/o 5-1-319, Fateh buruj, near old water tank,

Itwara Nanded-431604

M. No.-9172008841

# निवडणूक आयोगाच्या विरोधात ठाकरे बंधुंचा ४ ऑक्टोबरला मोर्चा

मुंबई/प्रतिनिधी-केंद्रीय निवडणूक आयोगातील अंतर्गत मतभेद आणि आयोगाच्या कारभारावरून निर्माण झालेल्या वादाच्या पार्श्वभूमीवर मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी निवडणूक आयोगाविरोधात आंदोलनाची घोषणा केली आहे. येत्या ४ ऑक्टोबरला मुंबईत जनमोर्चा काढण्यात येणार असल्याचे त्यांनी सोशल मीडियावरील पोस्टद्वारे जाहीर केले.

मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या नेतृत्वाखालील आयोगाच्या कारभारावर विरोधी पक्षांकडून प्रश्न उपस्थित केले जात आहेत. मतदार यादीच्या विशेष सखोल पुनरीक्षणाच्या (एसआयआर) प्रक्रियेवरही विरोधकांनी आक्षेप घेतले आहेत. याच पार्श्वभूमीवर राज ठाकरे यांनी निवडणूक आयोगाच्या कारभारावर टीका करत जनमोर्चाची घोषणा केली.या मोर्चासाठी विविध राजकीय पक्षांशी संवाद साधण्यात येणार असून, तो केवळ एका पक्षाचा न राहता जनतेचा आवाज ठरावा, असा प्रयत्न केला जाणार असल्याचे राज ठाकरे यांनी स्पष्ट केले. महाराष्ट्रातील नागरिकांनी मोठ्या संख्येने मोर्चात सहभागी व्हावे, असे आवाहनही त्यांनी केले आहे.दरम्यान, राज ठाकरे आणि शिवसेना नेते संजय राऊत यांची भेट झाल्यानंतर मोर्चाच्या घोषणेला अधिक महत्त्व प्राप्त झाले आहे. मोर्चाची वेळ आणि ठिकाण लवकरच जाहीर करण्यात येणार असून, या आंदोलनाला इतर राजकीय पक्षांचा कितपत प्रतिसाद मिळतो, याकडे राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे.

हे वृत्तपत्र प्रकाशक, मालक व संपादक प्रदिप अनंतराव नागापूरकर यांनी मुद्रक अब्दुल गफुर अब्दुल रझाक यांच्या सिमा प्रिंटींग अॅण्ड लिथो प्रिंटींग प्रेस इतवारा बाजार नांदेड, ता.जि.नांदेड येथे छापून नागापूरकर हाऊस, हाऊस नं.१-१०-६९३, विनायकनगर, नवा मोंढा, ता.जि.नांदेड-२ येथे प्रकाशीत केले.आर. एन. आय. नं. ४७१३५/८८ E-mail: nandedwarta@mail.com, मो.९४२२१७४७७४